0 7 FEB 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुराभिलेख परिसरातील हवा प्रदूषित

## विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या अहवालातील निष्कर्ष

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुराभिलेखागार परिसरात हवेची गुणवत्ता वेगाने प्रदूषित होत आहे. सूक्ष्म व अतिसूक्ष्म वायू प्रदूषक पीएम १०-२०२.०८, तर पीएम २.५-८७.२८ वर पोहोचले आहे. या परिसरात असणारे टाऊन हॉल संग्रहालय व उद्यान, न्यायालयाची जुनी इमारत, छत्रपती प्रमिला रुग्णालय (सीपीआर), जॉर्ज सिंक्लेअर यांचे निवासस्थान आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विविध जाती-धर्मियांसाठी निर्माण केलेली वसतिगृहे अशा सुमारे एक कि.मी. परिघातील ऐतिहासिक वारसास्थळे या प्रदूषणाच्या फेऱ्यात सापडली आहेत.

विविध इतिहासप्रेमी संघटना, मराठा सरदार घराण्यातील मंडळी, इतिहास संशोधक यांच्या वतीने कोल्हापूर पुरालेखागारच्या जतन-संवर्धन-संरक्षणासाठी गेली दोन वर्षे आंदोलनांसह पाठपुरावा सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून काही दिवसांपूर्वी पुरालेखागार परिसरात हवेच्या गुणवत्तेची चाचणी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने घेतली होती.

या चाचणीचा अहवाल शुक्रवारी मिळाला. आंदोलक वैभवराजे राजेभोसले, शुभम शिरहट्टी, चंद्रकांत कांडेकरी, रियाज डांगे, राहुल चौधरी आणि फिरोझ शेख यांनी हा अहवाल जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडे सादर केला. आंदोलकांनी जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी व आंदोलक संघटनांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करावी, अशी विनंती केली. सर्व माहिती घेतल्यानंतर जिल्हाधिकारी येडगे यांनी, भविष्याचा विचार करून कोल्हापूर पुरालेखागारबाबत आचारसंहिता संपताच सार्वजनिक बांधकाम विभागासोबत बैठक घेण्याचे अश्वासन दिले.

१५० वर्षांपूर्वी तत्कालीन ब्रिटिश आर्किटेक्ट आणि रॉयल इंजिनिअर चार्ल्स मँट यांनी सुमारे ८ एकर परिसरात निर्माण केलेल्या टाऊन हॉल बॉटनिकल गार्डनमधील अनेक जुन्या वृक्षांमुळे या परिसरातील हवा अधिक प्रदूषित होण्यापासून आजही संरक्षण मिळत असल्याचेही चाचणीत दिसून आले आहे.

ही चाचणी शिवाजी विद्यापीठ पर्यावरण विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, सहायक प्रा. डॉ. पल्लवी भोसले, लॅब असिस्टंट मिनाक्षी मगदूम, लॅब टेक्निशियन्स अमित माने आणि सूरज पाटील यांनी घेतली.

07 FEB 2026
पुण्यनगरी



हलकर्णी : सदिच्छा समारंभात मार्गदर्शन करताना प्रा. कविता वड्राळे. उपस्थित आर. एस. पाटील यांच्यासह अन्य.

# विद्यार्थ्यांना बारावीनंतर अनेक शैक्षणिक संधी : कविता वड्राळे

**हलकर्णी : वार्ताहर**

बारावीनंतर केवळ पारंपरिक अभ्यासक्रमांपुरते न थांबता विद्यार्थ्यांनी बी. ए., बी. कॉम.सह फाईन आर्ट, टुरिझम, जर्नालिझम यासारख्या विविध क्षेत्रांत संधी शोधाव्यात, असे प्रतिपादन प्रा. डॉ. कविता वड्राळे यांनी केले. हलकर्णी भाग ज्युनिअर कॉलेज (ता. गडहिंग्लज) येथे आयोजित इयत्ता बारावीच्या सदिच्छा समारंभात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. एस. पाटील होते.

प्रा. सोमनाथ खानापुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी कॉलेजच्या आदर्श विद्यार्थिनी अक्षता भेडिगिरी, तसेच चुलीवरील झुणका-भाकरी स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या हलकर्णी कॉलेजच्या विद्यार्थिनी, गावकरी व नारायणी गटाचा प्रमुख पाहुणे डॉ. कविता वड्राळे व एस. एल. लोहार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. एस. एम. वडर, प्रा. एम. एम. पानारी, प्रा. जे. एस. जाधव, प्रा. पी. व्ही. मुंगूरवाडी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. श्वेताली कोळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. व्ही. भोगाणे यांनी आभार मानले.

0 7 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मायणी, कऱ्हाड इंजिनिअरिंग कॉलेज प्रथम

## शिवाजी विद्यापीठात इंटर-झोनल नेटबॉल स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात इंटर-झोनल नेटबॉल (पुरुष व महिला) चॅम्पियनशिप २०२५-२६ स्पर्धेत मायणी येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजने पुरुषांच्या गटात प्रथम तर कऱ्हाड येथील गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेजने महिलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. आजरा महाविद्यालयाने या स्पर्धा घेतल्या होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधील नेटबॉल क्रीडांगणावर या स्पर्धा पार पडल्या. आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एन. सादळे यांनी पुरुषांच्या स्पर्धेचे तर महिला इंटर-झोनल नेटबॉल स्पर्धेचे उद्घाटन व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी योगेश पाटील होते.



शिवाजी विद्यापीठाच्या नेटबॉल क्रीडांगणावर इंटर-झोनल नेटबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

### स्पर्धेचे निकाल

**पुरुष नेटबॉल स्पर्धा :** प्रथम-आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, मायणी, द्वितीय-युजी व पिजी विभाग, शिवाजी विद्यापीठ, तृतीय-गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज, कऱ्हाड, चतुर्थ-विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**महिला नेटबॉल स्पर्धा :** प्रथम-गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज, कऱ्हाड, द्वितीय-शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, तृतीय-छत्रपती शाहू कॉलेज, रुकडी, चतुर्थ-कमला कॉलेज, कोल्हापूर.

07 FEB 2026

पुण्यनगरी

# वेणूताई चव्हाण यांच्या कार्यात परिवर्तनाची दिशा : डॉ. पाटील

**कोल्हापूर :** वेणूताई चव्हाण यांच्या कार्यात केवळ सेवा नव्हे, तर परिवर्तनाची स्पष्ट दिशा होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारती पाटील यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी वेणूताई चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनाच्या वतीने वेणूताई चव्हाण यांच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी त्यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नितीन माळी होते.

डॉ. भारती पाटील यांनी वेणूताई चव्हाण यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. त्या म्हणाल्या, वेणूताई चव्हाण यांच्याकडे केवळ यशवंतराव चव्हाण यांची सावली म्हणून पाहिले जाते. तथापि, त्यांचे स्वतःचे म्हणून असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा संघर्ष, धैर्य आणि सामाजिक योगदानाप्रति त्यांच्या मनात असलेल्या जाणिवा या सर्वच बाबी त्यांचे वेगळेपण दाखवणाऱ्या होत्या, असेही त्या म्हणाला. यावेळी डॉ. गजानन साळुंखे यांनी स्वागत, डॉ. प्रताप खोत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गडेकर, चेतन गळगे, डॉ. संतोष सुतार, मृणालिनी जगताप, डॉ. ऊर्मिला दशवंत आदी उपस्थित होते.

0 7 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेणूताई चव्हाण समग्र कार्याला लाभली परिवर्तनाची स्पष्ट दिशा

## डॉ. भारती पाटील यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानाचे आयोजन : संघर्ष, धैर्य, सामाजिक योगदानातून वेगळेपण

**जनप्रवास : कोल्हापूर**

वेणूताई चव्हाण यांच्या कार्यात केवळ सेवा नव्हे, तर सामाजिक सेवेपलीकडे एक परिवर्तनाची स्पष्ट दिशा त्यांच्या समग्र कार्याला लाभलेली होती, असे प्रतिपादन डॉ. भारती पाटील यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी वेणूताई चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनाच्यावतीने वेणूताई चव्हाण यांच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी डॉ. पाटील यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नितीन माळी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी उद्घाटन करताना डॉ. नितीन माळी. सोबत (डावीकडून) डॉ. गजानन साळुंखे, डॉ. भारती पाटील, डॉ. उमेश

यावेळी डॉ. भारती पाटील यांनी वेणूताई चव्हाण यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. त्या म्हणाल्या, वेणूताई चव्हाण यांच्याकडे केवळ यशवंतराव चव्हाण यांची सावली म्हणून पाहिले जाते. तथापि, त्यांचे स्वतःचे म्हणून असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा संघर्ष, धैर्य आणि सामाजिक योगदानाप्रती त्यांच्या मनात असलेल्या जाणीवा या सर्वच बाबी त्यांचे वेगळेपण दाखविणाऱ्या होत्या.

### अखंड साथसोबत...

अध्यक्षीय मनोगतात डॉ. नितीन माळी म्हणाले, वेणूताई चव्हाण यांनी ज्या तन्मयतेने यशवंतराव चव्हाण यांना अखंड साथसोबत केली, तिला तोड नाही. आजच्या पिढीसाठी ते अत्यंत आदर्शवत आणि प्रेरणादायी आहे.

वेणूताई चव्हाण यांनी आपल्या कार्यातून स्त्रीला स्वावलंबी,आत्मविश्वासी आणि विचारक्षम बनवण्याचा ध्यास घेतला होता. सामाजिक सेवेपलिकडे एक परिवर्तनाची स्पष्ट दिशा त्यांच्या समग्र कार्याला लाभलेली होती. आजच्या पिढीने वेणूताईंच्या व्यक्तीमत्त्वाचे हे पैलू लक्षात घेऊन त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

यावेळी डॉ. गजानन साळुंखे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.डॉ. प्रताप खोत यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला डॉ. उमेश गडेकर, चेतन गळगे, डॉ. संतोष सुतार, मृणालिनी जगताप, डॉ. उर्मिला दशवंत यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

07 FEB 2026

नवराष्ट्र Paschim Maharashtra | 07 February 2026 | Page 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# ध्वनिशोषक चाचणी उपकरणाचा शोध

## शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना मोठे यश; संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले

▶ **कोल्हापूर, (श. प्र.)** एखाद्या ठिकाणी बसविलेली ध्वनीयंत्रणा योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणारे सुवाह्य म्हणजेच पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरण तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी यश मिळविले आहे. या संशोधनाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठाचे ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. कल्याणराव गरडकर, जयसिंगपूर महाविद्यालयातील डॉ. संदीप साबळे व डॉ. रोहंत ढब्बे आणि इचलकरंजी येथील डी.के.टी.ई.एस. टेक्स्टाईल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या डॉ. चंद्रला जतकर या संशोधकांनी 'पोर्टेबल साऊंड अॅबसॉर्प्शन टेस्टर' हे उपकरण तयार केले आहे. व्यावसायिक ध्वनीयंत्रणेच्या ध्वनीशोषण क्षमतेच्या **चाचणीसाठी सदर उपकरण अत्यंत उपयुक्त सिद्ध झाले आहे.** आजपर्यंत एखादा रेकॉर्डिंग स्टुडिओ, रेकॉर्डिंग कक्ष, थिएटर, सभागृह इत्यादी ठिकाणी ध्वनीयंत्रणेसह ध्वनीशोषक यंत्रणा बसविल्यानंतर तिची क्षमता, ध्वनीशोषणातील अपेक्षित परिणामकारकता यासंदर्भात अनुभवातूनच चाचपणी केली जात आहे.






### ध्वनीशोषक वापरल्यामुळे वातावरण 'शांत'

उपकरणामुळे आता ध्वनीशोषण यंत्रणा बसविल्यावर लगोलग तिच्या क्षमतेची शास्त्रीय चाचणी करता येणे शक्य होणार आहे. अशा प्रकारचे हे उपकरण प्रथमच निर्माण करण्यात संशोधकांना यश मिळाले आहे. ध्वनीशोषण करणाऱ्या पोर्टेबल **शीट्स आणि पॅनल यांचा** उपयोग मुख्यत्वे थिएटर, स्टुडिओ आणि व्होकल रेकॉर्डिंग कक्ष यांसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केला जातो. ध्वनीशोषक वापरल्यामुळे मायक्रोफोनभोवती येणारा प्रतिध्वनी शोषून रेकॉर्डिंगसाठी 'शांत' वातावरण तयार केले जाते. यामुळे अधिक स्वच्छ आणि अधिक व्यावसायिक व्होकल किंवा वाद्यांचा आवाज मिळविण्यास मदत होते.



### फॅब्रिकेशन क्षेत्रातील संशोधनास उपयुक्त

ध्वनीशोषण फॅब्रिकेशन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठीही हे उपकरण उपयुक्त आहे. हे उपकरण सुवाह्य म्हणजेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज नेता येतेच, त्याशिवाय ते कमी खर्चिकही आहे. त्यामुळे या संशोधन कृतीचा समाजासाठी वापर होऊन शकतो. ध्वनीयंत्रणा तपासणीच्या क्षेत्रात ते अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पेटंट मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

### ध्वनीशोषक उपकरणाची कार्यप्रणाली

या पोर्टेबल ध्वनीशोषक चाचणी उपकरणाच्या कार्यपद्धतीची माहिती देताना डॉ. गरडकर म्हणाले, मानवी कानासाठीचा मानक श्रवणीय ध्वनी २० हर्ट्झ ते २० किलोहर्ट्झ स्पेक्ट्रम इतका आहे. या नव्याने शोधलेल्या ध्वनीशोषक चाचणी उपकरणामध्ये त्या दरम्यानच्या क्षमतेचे ध्वनीतरंग तयार करून चाचणी करावयाच्या ध्वनीशोषक वस्तूंवर प्रक्षेपित करून त्यावरुन परावर्तित केली जातात. त्या वस्तूंकडून शोषले न गेलेले ध्वनीतरंग माइक्रोफोनद्वारे करंट / व्होल्ट स्वरुपात उपकरणाच्या स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात. याद्वारे त्याठिकाणी ध्वनीशोषक यंत्रणा व्यवस्थित कार्यान्वित आहे किंवा कसे, याविषयीचा अंदाज बांधून लगेच त्यावर उपयोजनही करणे शक्य होते.

07 FEB 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थसंकल्पात डिजिटल, मनोरंजन क्षेत्रात सर्वाधिक संधी : डॉ. मारुलकर

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात मार्गदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अर्थसंकल्पात पावले उललली गेली आहेत. येत्या पाच वर्षांत डिजिटल आशय आणि मनोरंजन क्षेत्रात मोठी रोजगार निर्मिती होईल, तसेच एआय, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट आदी क्षेत्रांत सर्वाधिक संधी निर्माण होईल, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील सहयोगी प्रा. डॉ. केदार मारुलकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात डॉ. मारुलकर यांनी, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले? या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सुभाष कोंबडे होते. डॉ. मारुलकर म्हणाले, पुढच्या पाच वर्षात भारतीय पद्धतीचे एआय तंत्रज्ञान विकसित करून ते जगभर पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट असे नवीन क्षेत्र उदयास येत आहे. या क्षेत्रात रोजगाराची संधी अधिक असू शकतात. अर्थसंकल्पात लघु आणि मध्यम क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. महिलाकेंद्री उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. संरक्षण क्षेत्रात सरकार जास्तीत जास्त गुंतवणूक करत आहे. असे असले तरी देशातील वाढती विषमता आणि बेरोजगारी या प्रश्नांना भिडण्यासाठी अर्थसंकल्प कमी पडत आहे. विषमतेची दरी कमी करण्यासाठी ठोस उपाय दिसत नाहीत.



**कोल्हापूर : केंद्रीय अर्थसंकल्पावर मार्गदर्शन करताना डॉ. केदार मारुलकर, डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुभाष कोंबडे आदी.**

अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. सुभाष कोंबडे यांनी, सरकारने नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे. तसेच महागाईचा दर नियंत्रित ठेवणे आणि चलनाचे अवमूल्यन रोखणे सर्वात मोठे आव्हान असून त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सांगितले. स्वागत व प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन तेजश्री शिंदे हिने तर समृद्धी मोदक हिने पाहुण्यांची ओळख करून दिली. उद्देश पाटील याने आभार मानले.

0 7 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# अर्थसंकल्पात विषमतेवरील उपायांचा अभाव

## डॉ. केदार मारुलकर यांचे प्रतिपादन : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात व्याख्यानाचे आयोजन

**जनप्रवास : कोल्हापूर**

केंद्रीय अर्थसंकल्पात लघु आणि मध्यम क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. महिलाकेंद्री उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. संरक्षण क्षेत्रात सरकार जास्तीत जास्त गुंतवणूक करत आहे. असे असले तरी देशातील वाढती विषमता आणि बेरोजगारी या प्रश्नांना भिडण्यासाठी अर्थसंकल्प कमी पडतो. अर्थसंकल्पात कोणताही लोकानुनय नसला तरी विषमतेची दरी कमी करण्यासाठी ठोस उपाय त्यात दिसत नाहीत. संपूर्ण लोकसंख्येला उचित न्याय मिळण्याची सोय केल्याशिवाय अर्थसंकल्पातून ठोस काही हाती लागणार नाही, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. केदार मारुलकर यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : केंद्रीय अर्थसंकल्पावर बोलताना डॉ. केदार मारुलकर, डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुभाष कोंबडे.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात डॉ. मारुलकर यांचे 'माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला बजेटने काय दिले?' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सुभाष कोंबडे होते.

डॉ. मारुलकर म्हणाले, माध्यम आणि मनोरंजन उद्योग येत्या काळात आणखी वाढेल, असे संकेत आहेत. विशेषतः डिजिटल आशय निर्मितीत भारत आघाडी घेईल. पुढच्या पाच वर्षात भारतीय पद्धतीचे एआय तंत्रज्ञान विकसित करुन ते जगभर पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. गतवर्षापासून एआयवर केंद्रीय अर्थसंकल्पात विशेष जोर दिला जात आहे. मनोरंजनाशी संबंधित डिजिटल आशय निर्मितीत पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रयत्न होत आहे. ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट असे नवीन क्षेत्र उदयास येत आहे. या क्षेत्रात रोजगाराची संधी अधिक असू शकतात.

केंद्रीय अर्थसंकल्पात लघु आणि मध्यम क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. महिलाकेंद्री उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. संरक्षण क्षेत्रात सरकार जास्तीत जास्त गुंतवणूक करत आहे, असे असले तरी देशातील वाढती विषमता आणि बेरोजगारी या प्रश्नांना भिडण्यासाठी अर्थसंकल्प कमी पडतो. अर्थसंकल्पात कोणताही लोकानुनय नसला तरी विषमतेची दरी कमी करण्यासाठी ठोस उपाय त्यात दिसत नाहीत. संपूर्ण लोकसंख्येला उचित न्याय मिळण्याची सोय केल्याशिवाय अर्थसंकल्पातून ठोस काही हाती लागणार नाही, असे डॉ. मारुलकर म्हणाले.

प्रा. डॉ. सुभाष कोंबडे म्हणाले, भारताला विकसनशील राष्ट्रापासून विकसित राष्ट्राकडे घेऊन जाण्यासाठी सरकार नेटाने प्रयत्न करत आहे. नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे. शिवाय जास्तीत जास्त रोजगार निर्माण होईल, अशा उद्योगांना पाठबळ दिले पाहिजे. यंदाच्या अर्थसंकल्पात याची काळजी घेतली आहे. शिवाय कृषि प्रक्रिया उद्योगांनाही चालना देण्याचा प्रयत्न आहे. दरम्यान, महागाईचा दर नियंत्रित ठेवणे आणि चलनाचे अवमूल्यन रोखणे सर्वात मोठे आव्हान असून त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. स्वागत व प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन तेजश्री शिंदे हिने तर समृद्धी मोदक हिने पाहुण्यांची ओळख करुन दिली. उद्देश पाटील याने आभार मानले.

### एआय, ॲनिमेशन , व्हिज्युअल इफेक्ट क्षेत्रात सर्वाधिक संधी

भारत जगातील गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था असून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अर्थसंकल्पात पावले उललली गेली आहेत. येत्या पाच वर्षांत डिजिटल आशय आणि मनोरंजन क्षेत्रात मोठी रोजगार निर्मिती होईल, तसेच एआय, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट आदी क्षेत्रात सर्वाधिक संधी निर्माण होईल, असे मत डॉ. केदार मारुलकर यांनी व्यक्त केले.

07 FEB 2026

तरुण भारत

# 'अर्थसंकल्प २०२६' विषयावर विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर : केंद्र सरकारचा अर्थसंकल्प शिक्षण, उद्योग आणि रोजगाराचा विकासमार्ग असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. केदार मारुलकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत 'अर्थसंकल्प २०२६: विकसित भारताकडे वाटचाल" या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. उपकुलसचिव विनय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मारुलकर म्हणाले, अर्थसंकल्पातील तरतुदींमधून देशाच्या विकासाची दिशा स्पष्ट दिसते. वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्पाचे विश्लेषण केले पाहिजे. अर्थसंकल्पातील पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, शिक्षण, रोजगारनिर्मिती, कररचना व सामाजिक कल्याण यावर विश्लेषण केले. डॉ. सुशांत माने यांनी स्वागत केले. सुमन लोहार यांनी परिचय करून दिला. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.

07 FEB 2026

पुण्यनगरी

# शिक्षण, उद्योग, रोजगाराचा विकासमार्ग दाखविणारा अर्थसंकल्प : डॉ. मारुलकर

**कोल्हापूर :** अर्थसंकल्पातील तरतुदींमधून देशाच्या विकासाची दिशा स्पष्ट दिसते. केंद्र सरकारचा अर्थसंकल्प शिक्षण, उद्योग आणि रोजगाराचा विकासमार्ग आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. केदार मारुलकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत 'अर्थसंकल्प २०२६ : विकसित भारताकडे वाटचाल' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

डॉ. मारुलकर म्हणाले, वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी या अर्थसंकल्पाचे सखोल विश्लेषण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्प वाचनाची नवी दृष्टी प्राप्त केली पाहिजे. अर्थसंकल्पातून 'विकसित भारता'चा मार्ग स्पष्ट दिसत असल्यामुळे तो देशासाठी महत्त्वाचा आहे. अध्यक्षीय भाषणात संचालक डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, अर्थसंकल्प देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक म्हणून काम करत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी तो बारकाईने समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उपकुलसचिव विनय शिंदे प्रमुख उपस्थित होते. डॉ. सुशांत माने यांनी प्रास्ताविक केले. सुमन लोहार यांनी परिचय करून दिला. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.